VOL- VIII ISSUE- VIII AUGUST 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# २०१४ विधानसभेची निवडणूक आणि कारणमिमांसा

संशोधक विद्यार्थी
**अविनाश गंगाधर मुसळे**
एम.ए., बी.एड., (राज्यशास्त्र)
पीपल्स कॉलेज, नांदेड

**प्रस्तावना**

भाजपाने महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीची धुरा गोपीनाथराव मुंडे यांच्यावर सोपविण्यात आली. महाराष्ट्रात सत्तेचे गणित जुळवण्यासाठी मुंडे यांनी भाजप, शिवसेना, रिपाइं, रासपा, स्वाभिमानी शेतकरी संघटना व शिवसंग्राम या सहा पक्षांची महायुती करून सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग अंमलात आणला. त्यांनी महाराष्ट्रात सर्वत्र अनेक विक्रमी सभा घेतल्या. तर नरेंद्र मोदी यांनी हायटेक प्रचार यंत्रणा व मीडियाद्वारे भारताच्या कानाकोपऱ्यात प्रचार करतेवळी सीमेवरील सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था, वाढती महागाई, काळा पैसा, भ्रष्टाचार, पारदर्शक शासन, विकासाभिमुख शासन अशा मुद्यांवर भर देण्यात आला. यासाठी मोदींनी तबल ३ लाख कि.मी. प्रवास करीत ४३७ विक्रमी सभा घेतल्या. १७ मे २०१४ रोजी निकाल घोषित झाले तेव्हा मोदी लाटेचे त्सुनामीत रुपांतर होऊन काही प्रादेशिक पक्षांचा अपवाद वगळता काँग्रेस पक्षाचे पानिपत झाले. एनडीएने ३३८ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळविले. युपीएला ६५ वर्षांच्या इतिहासात सर्वात नीच्चांकी, मानहानीकारक पराभवाला सामोरे जावे लागले. काँग्रेसला केवळ ४५ जागा मिळाल्या.

महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना हे चारही पक्ष प्रभावी असल्याने महायुतीला जास्तीच्या जागा जिंकणे अशक्य होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन मुंडेच्या नेतृत्वाखाली शिवसेना (ब्राह्मण), रासपा (धनगर व हटकर), स्वाभिमानी शेतकरी संघटना (जैन), रिपाइं (दलित), शिवसंग्राम (मराठा) आदी सर्व जाती-धर्मातील नेतृत्वाची गोळाबेरीज करुन एकमुखी लढा दिला. त्यामुळे महाराष्ट्रात महायुतीच्या ४८ पैकी ४२ जागा निवडून आल्या.

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४**

लोकसभेप्रमाणेच राज्य विधानसभेतही नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सत्तांतर घडून आले. केंद्रातील काँग्रेस आघाडीची दहा वर्षांची सत्ता भाजपाच्या विजयाने संपुष्टात आली. लोकसभेतील ऐतिहासिक यशामुळे राज्य भाजपाने शिवसेनेबरोबरची २४ वर्षांपासूनची युती तोडून स्वबळावर निवडणुका लढवध्याचा निर्णय घेतला. भाजपा-शिवसेनची युती तुटल्यामुळे काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसनेदेखील स्वातंत्र्यपणे निवडणुकीला समोर गेले. पंधरा वर्षे दोन प्रबळ आघाड्यांमध्ये स्थिरावलेली पक्षीय स्पर्धा चार प्रबळ पक्षामध्ये ह्या निवडणुकीत रंगली होती. काँग्रेस, राष्ट्रवादी काँगेस, शिवसेना आणि भाजप या प्रमुख चार पक्षांचया स्पर्धेत भाजपाने सर्वाधिक जागा जिंकून सत्तेवर आले. राष्ट्रवादीने भाजप सरकारला बाहेरूप पाठिंबा दिल्याने शिवसेना मात्र कोंडीत सापडली होती. प्रदीर्घ काळ सत्तेवर असणारा काँग्रेस पक्ष तिसऱ्या स्थानावर तर तिसऱ्या स्थानावरील भाजपा पहिल्या स्थानावर आला. राजकीय पक्षांचे निवडणूक राजकारणातील नेतृत्व, संघटन, विचारप्रणाली आणि सामाजिक आधार हे जर प्रमुख घटक मानले तर काँग्रेसची ह्या घटकांबाबत पडझड तर भाजप या घटकांबाबत मजबूत झाली. या चार घटकांआधारेच काँग्रेसच्या पराभवाची तर भाजपाच्या यशाची चर्चा करता येईल.

महाराष्ट्रात १४ वर्षानंतर जे यश मिळाले आहे हे अचानक किंवा मोदीलाटेमुळे मिळाले आहे असे म्हणणे चुकीचे आहे. कारण त्यामागे १९८० पासूनचे संघटीत आणि व्यूहरचनात्मक प्रयत्न आहेत. १९७७ च्या जनता सरकारने केंद्रात तर १९७८ साली पुलोद सरकारने राज्यात जनसंघास पवित्र करून सत्तेत वाटा दिला. येथूनच उजव्या शक्ती राजकीयदृष्ट्या बळकट होण्याची प्रक्रिया सुरू झाली. १९७८ साली पुलोद प्रयोगात सामाविष्ट झालेला जनसंघ एप्रिल १९८० मध्ये भाजपा म्हणून उदयास आला. १९८० सालच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला १४ जागा मिळाल्या होत्या. तर २०१४ पर्यंत भाजपाला १२३ जागापर्यंत पोहचला. दीर्घकाळापासून सत्तेवर असणाऱ्या काँग्रेस पक्षाप्रमाणे सहकार किंवा इतर संस्थात्मक जाळे भाजपाकमागे नसतानादेखील भाजपाने हे यश कसे प्राप्त केले हे पाहणे आवश्यक ठरते. त्यासाठी लोकशाहीत

राजकीय पक्ष म्हणून जी संरचनात्मक चौकट असते त्याचा विचार करावा लागेल. पुढीलप्रमाणे भाजपाच्या राजकीय पक्षवाढीची आधारभूत चार घटक मांडले आहेत.

**१. राजकीय नेतृत्व**

राजकीय नेतृत्वावरच राजकीय निवडणुकीच यश किंवा अपयश अवलंबून असते. २०१४ च्या निवडणुकीमध्येसुद्धा राजकीय नेतृत्वाचे मोठे योगदान राहिले आहे. राहुल गांधीची सभा आपल्या मतदारसंघात व्हावी यासाठी नव्हे तर सभा होऊ नये यासाठी काँग्रेसच्या अनेक उमेदवारांनी प्रयत्न केले. आपला नेता अपल्याला जिंकून देऊ शकतो यावर काँग्रेस उमेदवरांचा विश्वास राहिला नव्हता. तर या उलट भाजप उमेदवार नरेंद्र मोदींच्या सभेसाठी आग्रही होते. पण मोदींनी जेवढ्या सभा घेतल्या त्या तुलनेत भाजपाचे यश मर्यादितच राहिले. परंतु भाजपाच्या विजयाचे सारे श्रेय नरेंद्र मोदी व अमित शहा यांनाच देण्यात आले. राज्य पातळीवरील नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, एकनाथ खडसे, पंकजा मुंडे यांचा विशिष्ट भागात प्रभाव आहे आणि त्यांनी आपले उमेदवार निवडून आणण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. पण याकडे दुलक्ष करण्यात आले. निवणुकीच्या तोंडावर पंकजा मुंडेनी काढलेली ''शिंदखेड राजा ते चोंडी संघर्ष यात्रा'' वातावरण निर्मिती करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली. परंतु याकडे वरिष्ठ नेतृत्वाने दुर्लक्ष केले. अमित शहांच्या मायक्रोप्लॅनिंगचा गवगवा झाला, परंतु राज्य भाजपात प्रमोद महारजनापासूनच असलेल्या मायक्रोप्लॅनिंगचा साधा उल्लेख झाला नाही. भाजपाकडे केंद्र व राज्यातील आक्रमक नेतृत्वाची फळी होती तशी काँग्रेसकडे नव्हती. काँग्रेसकडे राज्यव्यापी नेतृत्व तर नव्हतेच पण भिागीय नेतृत्वही नव्हते. जिलहा किंवा मतदारसंघापुरते नेतृत्व शिल्लक राहिलेले दिसते. काँग्रेसने सामूहिक नेतृत्वाखाली निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला. परंतु पृथ्वीराज चव्हाण स्वतःच्याच प्रचारात, नारायण राणे स्वतःच्या व मुलाच्या प्रचारात माणिकराव ठाकरे मुलाच्या प्रचारात, सुशीलकुमार शिंदे मुलींच्या प्रारात, अशोक चव्हाण पत्नीच्या प्रचारात व्यस्त होते. ज्यांच्याकडे सामुहीक नेतृत्व होते ते पक्षांच्या उमेदवारांसाठी फिरलेच नाही. काँग्रेसचे जे ४२ उमेदवार निवडून आले, त्यात पक्षापेक्षा स्थानिक राजकारणाचा, त्यांच्या संस्थात्मक नेटवर्कचा वाटा अधिक आहे. राष्ट्रवादीचे नेते राज्यात फिरले पण त्यांच्याबाबत लोकांत एक प्रकारची नकारात्मक भावना तयार इ ाालेली दिसून आली. राज्य भाजपच्या नेत्याविषयी लोकांची भावना चांगली असूनही मोदींच्या नेतृत्वाखाली राज्य भाजपाचे नेतृत्व झाकाळून गेले.

**२. संघटनात्मक बांधणी**

संघटनात्मक बांधणी ज्या पक्षाची मजबूत असते तोच पक्ष सत्तेचा दावेदार असतो. पक्ष संघटन म्हणून काँग्रेसची संघटन व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडलेली दिसते. लोकसभेतील पराभवानंतर पक्ष संघटनेत चैतन्य-उत्साह निर्माण करण्याचे कोणतेही प्रयत्न झाले नाहीत. पक्ष संघटनेत कार्यकर्ता हा आधारभूत घटक पण काँग्रेसला नवीन कार्यकर्ता घडवण्यात अपयश आलेले दिसते. प्रचारासाठी, पोलिंग एजंट म्हणून रोजंदारीवर कार्यकर्ते ठेवावे लागले. शहरी भागात पक्षासमोर कार्यकर्त्यांचा मोठा प्रश्न आहे. पक्षासाठी पूर्णवेळ काम करणारा कार्यकर्ता ही संकल्पना मागे पडली आहे. आर्थिक व्यवहाराशिवाय कार्यकर्ता बिल्डर लॉबीशी जोडले गेलेले आहेत. सत्तेचा कल बघून ते रात्रीतून पार्टी बदलतात. ग्रामीण भागात सहकार व इतर संस्थात्मक नेटवर्कमुळे हा प्रश्न तीव्र इ ाला नाही. परंतु कार्यकर्त्यांची अभ्यास शिबिरे, प्रशिक्षण शिबिरे, पक्षाचे विचार धोरणे या संदर्भातील मार्गदर्शन करण्याची प्रक्रिया बंद पडली. काँग्रेस सेवा दल, एनएसयुआयचे कार्य ठप्प झाले. नवीन सदस्यनोंदणीची प्रक्रिया जवळपास बंद पडली. त्यामुळे पक्षाचा कार्यकर्ता घडण्याची प्रक्रिया थंडावली. शिवाय स्थानिक ते राज्य पातळीवर विशिष्ट घरण्यांनाच सतत संधी मिळत असल्याने काँग्रेसकडे नवीन तरूण पिढीने पाठ फिरवली. यामध्ये काँग्रेस नेतृत्व, काँग्रेस संघटना, काँग्रेस कार्यकर्ता आणि सामान्य मतदार त्यांचे प्रश्न यात अंतर वाढल्याने मतदार काँग्रेसपासून तुटताना दिसून येतो.

एकेकाळी मास पार्टी असलेल्या काँग्रेसपासून जनता दुरावली अहे पक्षाचा संबंध फक्त तिकिटे देण्यापुरता राहिला. संघटनात्मक व आर्थिक बळ देण्यात पक्ष तयार नाही. राष्ट्रवादीने आपल्या उमेदवारांना बळ पुरविले. परंतु त्यांचे कार्यकर्ते आर्थिक हितसंबंधावर अधिक टिकून राहिलेले दिसतात तर भाजप व शिवसेनेचे कार्यकर्ते पंधरा वर्षे सत्ता हाती नसतानाही एकनिष्ठ राहिले होते. ज्याप्रमाणे भाजपाचे संघटन आक्रमक व मजबूत दिसते आणि मोदींच्या हाती नेतृत्व आल्याने ते अधिक सक्रिय दिसते. पण मोदींच्या हाती संघटन आल्याने त अति आक्रमक व अतिकेंद्रीत बनत असून ते भाजपाच्या पक्षव्यवस्थेत आव्हान ठरणार आहे. काँग्रेसमध्ये केंद्रात इंदिरा गांधींचे तर राज्यात शरद पवारांचे अति महत्त्वकांक्षी नेतृत्व निर्माण झाल्याने काँग्रेस संघटनेत फूट पडली. १९७७ नंतर

केंद्रात तर १९७८ च्या पुलोद प्रयोगानंतर राज्यत काँग्रेस पक्ष बहुमताने सत्तेत आला परंतु ह्या कालखंडात पक्ष संघटना विभाजितही झाली. आजच्या काँग्रेस पाडावात सत्तरच्या दशकातील संघटनेतील फूट हा एक महत्त्वाचा टप्पा ठरतो.

**३. विचारप्रणालीचा आधार**

प्रत्येक राजकीय पक्षाला विचारधारेचा आधार असतोच. कारण राजकीय पक्ष उदयास येत असताना त्यांची स्वातंत्र ओळख घेऊनच येत असतो. १९९० नंतरच्या कालखंडात नवीन आर्थिक धोरण, आघाड्यांचे राजकारण, सत्ता आणि आर्थिक हितसंबंधात डावे-उजवे किंवा मध्यममार्गी हे विचार अस्पष्ट बनत गेले. सुरूवातीच्या कालखंडातील काँग्रेस व्यापक सर्वसमावेशक व मध्यममार्गी होती. समाजवादी, धर्मनिरपेक्ष धोरणांचा पाठपुरावा काही काळ केला. परंतु शहाबानो प्रकरण, बाबरी पाडाव ते नवीन आर्थिक धोरण असे क्रमाक्रमाने काँग्रेसची व्यापकता संकुचित बनत गेली. आपली सेक्युलर भूमिका ठामपणे मांडझे सोडॅन दिल्यानेच एमआयएमचा शिरकाव होताना दिसतो आहे. काँग्रेसची वैचारिक भूमिका संदिग्ध बनत गेली. कोणतीही भूमिका न घेता काँग्रेस निवडणुकीत उतरल्या गेली. ती वैचारिक दृष्ट्या इतकी दुबळी बनली की गांधी-नेहरूंचे विचारही आता पुढे रेटेनाशी झ ाली. परंतु काँग्रेसच्या तुलनेत भाजपाने आपले मू विचार सोडले नाहीत. हा घटक भाजपाच्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या विजयात महत्त्वाचा ठरला. हिदुत्व किंवा हिंदू राष्ट्रवाद हा भाजपाचा मूळ अजेंडा १९९९ किंवा २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत थेटपणे आणला नाही. कारण हिंदुत्वाच लाटेतही १९९१, १९९६, १९९८ रोजीच्या निवडणुकीत भाजपास स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी हिंदुत्वाचा मुद्दा बाजूला ठेवून विविध विचारांचे विविध प्रादेशिक अस्मिता असणाऱ्या लहान-मोठ्या पक्षांशी आघाडी करून निवडणुका लढविण्याची व्यूहनीती आखली व १९९९ साली सत्ता प्राप्त केली. परंतु रथयात्रा, राम मंदिर अभियान, बाबरी पाडाव, कलम ३७० रद्द रण्याची भूमिका, गुजरात दंगल आदी बाबींतून आपली हिंदू संरक्षक ही प्रतिमा अगोदरच निर्माण करून निश्‍चित अशी व्होट बँक कायम ठेवली. त्या जोडीला आपाण व्यापक आहेत आणि सत्तेपर्यंत जाण्यासाठी जनाधार वाढविण्यासाठी व नवीन मित्र पक्ष जोडण्याच्या दृष्टीने भाजपाने आपल्या विचारात लवचिकता दाखविली. आणीबाणीनंतर जयप्रकाश नारायण यांना प्रथम हायजॅक केले. नंतर गाधीवादी समाजाद, स्वदेशी अर्थव्यवस्थेच्या आणि १९९१ नंतर नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला गेला. यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे १९९९ नंतरच्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुका विकासाच्या मुद्यावर लढविल्या गेल्या.

**४. सामाजिक आधार**

सामाजिक पाठिंब्यातील बदल हा अचनाक घडून आला असे नाही. प्रारंभीच्या काळातील शहरी व उच्च जातवर्गीय पक्ष ही भाजपाची ओळख पुसण्याची सुरूवात वसंतराव भागवत, प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे यांनी केली आणि प्रयत्नपूर्वक बहुजनवादी चेहरा देण्याचा व ग्रामीण भागात विस्ताराचा प्रयत्न केला. धनगर, माळी आणि वंजारी ह्या ओबीसी जातींना संधी व प्रतिनिधित्व देत सत्ता वंचित मराठ्यांनाही जवळ करण्याचे धोरण स्वीकारले. भाजपाशी संबंधित इतर संस्था, संघटनांनी आदिवासी भागात शिक्षण, आरोग्याच्या प्रश्नांवर काम करून काँग्रेसचा आदिवासी मतदार तोडला. २०१४ सालच्या लोकसभा निवडणुकाआधी गोपीनाथ मुंडेनी महादेव जानकर, राजू शेट्टी, रामदास आठवले व विनायक मेटे यांच्या पक्षांशी आघाडी केली. ही केवळ राजकीय आघाडीच नव्हती तर ती सामाजिक आघाडी होती. ही सामाजिक आघाडी पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेस व राष्ट्रवादीच्या बालेकिल्यात भाजपाला यश मिळवून देण्यात महत्त्वाची ठरली. याउलट काँग्रेसमागे कोणताही समाजघटक ठामपणे उभे राहिलेला दिसत नाही. एकेकाळी सर्वसमाज घटकांचा काँग्रेस आज कोणाचा असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे प्रभावी नेतृत्वाचा अभाव,, विस्किळीत व कमजोर पक्ष संघटन, संदिग्ध विचारप्रणाली आणि सामाजिक आधाराची पडझड पाहता काँग्रेसला नव्याने उभारी घेण्यास नजीकच्या काळात तर अवघड जाणार हे स्पष्टच आहे.

२०१४ रोजी भाजप पक्ष १२२ जागा जिंकूण सर्वात मोठा पक्ष ठरला. म्हणजेच २००९ च्या तुलनेत ७६ जागाची वाढ झाली. नेतृत्व, संघटन, विचारप्रणाली आणि सामाजिक आधार हे भाजपाच्या विजयाचे प्रमुख आधार धरले. नेतृत्व, संघटन, विचारप्रणाली आणि सामाजिक आधार या चारिही मुद्यावर भाजप पक्षाचे एकछत्री वर्चस्व होते. त्यामुळेच भाजपाला १२२ जागापर्यंत मजल मारता आली.

**२०१४ च्या महाराष्ट्र विधानसभा सत्तांतराची कारण मिमांसा**

महाराष्ट्रामध्ये १९७८ ते १९८० आणि १९९५ ते १९९९ हा कालावधी सोडला तर सातत्याने काँग्रेस आणि १९९९ नंतर राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाची सत्ता राहिली आहे. परंतु २०१४

रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये सत्तांतरण घडून आले. हे सत्तांतरण होण्यासाठी काही घटक प्रभावी ठरले यामध्ये महाराष्ट्राच्या नेतृत्वातील राजकीय पोकळी, सांस्कृतिक पोकळी, बदलते उत्पादन संबंध आणि सरंजामी कॉर्पोरेट व्यवस्था या मुद्याचा प्रभाव पडलेला दिसून येतो. या चार मुद्याची पुढीलप्रमाणे कारण मिमांसा केली आहे.

**१. नेतृत्वाची राजकीय पोकळी**

१९९९ ते २०१४ पर्यंत सातत्याने महाराष्ट्रामध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिले. परंतु या पक्षात सातत्याने पक्षांच्या नेतृत्वामध्ये पोकळी पडलेली दिसून येत होती. राजकीय पोकळीचा संबंध निर्णय निश्चिती, निर्णयांची जबाबदारी आणि निर्णयांचे स्वरूप या तीन घटकांशी जोडलेला होता; कारण राजकीय निर्णय कोण घेत आहे, यामध्ये संदिग्धता आली होती. कारण राष्ट्रवादी काँग्रेसचे निर्णय केंद्रातील नेतृत्व शरद पवार तर काँग्रेसचे निर्णय केंद्रातील सोनिया गांधी घेतात अशी समज महाराष्ट्रामध्ये झाली होती. तर राज्यामध्येसुद्धा पृथ्वीराज चव्हाण की अजित पवार निर्णय घेतात यामध्येसुद्धा पेचप्रसंग निर्माण झाला होता. त्यामुळे निर्णय घेणारे नेतृत्व, राजकीय पक्ष आणि शासन या तीन घटकांमध्ये एकवाक्यता नव्हती. त्यामुळे जबाबदारी या तत्त्वाचा संकोच झाला होता. राजकीय निर्णयांची जबाबदारी कोणावरही नव्हती. या जबाबदारीच्या पोकळीमुळे बेजबाबदर नेतृत्व, पक्ष आणि शासन अशी प्रतिमा दोन्ही काँग्रेसबद्दल झाली होती. दोन्ही काँग्रेस पक्ष परस्परांवर टिका करत होते. निर्णयांच्या बद्दल काँग्रेस पक्ष सरकारमधील आघाडीतील त्यांच्या घटकपक्षाला जबाबदार मानत होते; म्हणजेच जबाबदारी काँग्रेस पक्षाची की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ? असा प्रश्न उपस्थित झाला होता. ही जबाबदारी स्वीकारण्याची दोन्ही पक्षांची तयारी नव्हती. तसेच बेजबाबदारपणामुळे सरकारचा मानवतावादी चेहरा अदृश्य झाला होता; यामुळे जनता आणि दोन्ही काँग्रेस यांच्यामध्ये दुरावा निर्माण झाला होता. शेवटी आरक्षणाच्या निर्णयाने तर सरकारच्या निर्णयांचे स्वरूप हे सत्तासंबंधकेंद्रीत असल्याचे शिक्कामोर्तब झाले. त्यामुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वात पोकळी निर्माण झाल्याचा फायदा भाजपाला झालेला दिसून येतो.

**२. सांस्कृतिक पेचप्रसंग**

नवबौद्ध समाजाची ओळख रूढीवादविरोधी होती ती ओळख रिपब्लीकन पक्षाने कमी केली. त्यांनी शिवसेना-भाजप बरोबर जुळवून घेतले; यामुळे हिंदूत्व अस्मिता आणि नवबौद्ध अस्मिता यो दोन्हींमध्ये सादृश्यमूलक अस्मिता घडली होती. त्यामुळे अंतरायाचे प्रारूप लोप पावले. त्यांची जागा साधर्म्यमूलक विस्ताराने घेतली होती. या दोन्ही काँग्रेस समोरचा सांस्कृतिक पेचप्रसंग होता. तसेच दलितांमध्ये क्रांतीचे धुरीणत्व नवबौद्धांकडे आहे हा त्यांचा दावा होता. या अर्थाने दलित अस्मितेमध्ये नवबौद्ध वरच्या स्थानावर होते. तसेच हिंदू दलितांच्या समावेशनालादेखील मर्यादा आल्या होत्या, यामुळे एकूण दलित समाजामध्ये त्यांना राजकीय व नोकरीच्या क्षेत्रातून वगळले जाते, अशी जाणीव निर्माण झाली होती. याबद्दल तीव्र भावना दलित समाजामध्ये होती. 'बामसेफ' या संघटनेने अशा राजकारणावर सातत्याने टिका करणे सुरू केले होते. परंतु ही दलित जनतेच्या नाराजीकडे दोन्ही काँग्रेसने लक्ष दिले नाही. महाराष्ट्रातील बामसेफ संघटनेच्या सांस्कृतिक भूमिकेचा परिणाम उच्च जाती आणि मराठा या दोन महत्त्वाच्या समूहांवर झाला. त्यामुळे उच्च जाती आणि मराठा या दोन समाजांमध्येदेखील सांस्कृतिक पेचप्रसंग निर्माण झाला. मराठा समाजांमध्ये सांस्कृतिक पातळीवर धरसोड होत होती. छत्रपती शिवाजीमहारांविषयक वेगवेगळ्या अस्मिता आकराला आल्या होत्या. मराठा समाजांच्या जाणिवांमध्ये उच्च जाती, नवबौद्ध आणि मुस्लिम यांना वगळण्याची जाणीव होती. तसेच मराठा आणि ओबीसी यांच्या जाणिवांमध्ये राखीव जागांच्या मुद्यांवर शत्रुत्त्वाची भावना निर्माण झाली होती. सत्ता वाटपामध्ये विषमता असल्याची भावना ही मराठेत्तरांमध्ये तीव्र झाली होती. तसेच मराठा समाज आक्रमपपणे काम करीत होता.

**३. बदलते उत्पादन संबंध**

महाराष्ट्राच्या राजकारणाचा पाया हा शेती आणि उद्योग यांच्या समन्वयाच्या राजकीय अर्थकारणामध्ये होता. या पायाभूत समन्वयाच्या सूत्रामध्ये फेरबदल झाले. कारा महाराष्ट्रामध्ये उत्पादन आणि उत्पादन संबंध या दोन्ही गोष्टींमध्ये शहरापासून ते थेट ग्रामीण भागांपर्यंत फेरबदल झाले आहेत. केवळ गेल्या पंधरा वर्षांमध्ये उत्पादन साधनांवरील नियंत्रण गेलेल्या वर्गांची एक मोठी फौज तयार झाली होती. ग्रामीण भागातील जमिनी शेतकरी वर्गाकडून उद्योग शहारातील श्रीमंत बिगर मराठी किंवा ग्रामीण भागातील श्रीमंतांकडे गेल्या यामुळे ग्रामीण भागात शेती हा व्यवसाय नसलेला वर्ग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या वर्गांनी कामांच्या शोधासाठी शहरात स्थलांतर होत गेले. तसेच रोजगार आणि कृषी उत्पनाचा मुद्दा भाजपाने लावून धरल्याने त्यांना वातावरण अनुकूल होत गेले.

### ४. कॉर्पोरेट क्षेत्र

२०१४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवर कॉर्पोरेट क्षेत्राचा प्रभाव पडला आहे. कॉर्पोरेट क्षेत्राने सादृश्यमूलक चिंतन आणि त्यांचा विस्तार गतिशीलपणे केला. भाजप व शिवसेना पक्षांना कॉर्पोरेट क्षेत्रामधून पाठिंबा मिळत गेला. कॉर्पोरेट क्षेत्र संदेश देणे, संसूचन करणे, अस्मिता निर्मिती करणे, मतदारसंघ बांधणी करणे, प्रचार करणे अशा विविध राजकीय घडामोडींमध्ये कृतिशिल होते. त्यामुळे कॉर्पोरेट क्षेत्राचा प्रभाव वाढला. अर्थात ही घडामोड नव्वदीच्या दशकापासून घड आहे. राजकारण घडविणाऱ्या कॉर्पोरेट क्षेत्राचा उदय नव्वदीच्या दशकात झाला आहे. मात्र २०१४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये राजकारण करण्यामध्ये कॉर्पोरेट क्षेत्राचा सहभाग इतर निवडणुकांच्या तुलनेत जास्त आहे. सरंजामी कॉर्पोरेट व्यवस्था दोन भिन्न आणि परस्प्र विरोधी मूल्यांवर आधारित होती. त्यामुळे त्याचा मध्यवर्ती आशय रूढीवाद होता. तसेच सरंजामी कॉर्पोरेट व्यवस्था ही उपयुक्तेच्या मूल्याभोवती फिरत होती. ती ताकद अर्थातच दोन्ही काँगेस विरोधातील होती. तिचा लाभ राजकीय पक्ष म्हणून भाजप व शिवसेना पक्षांनी उठवला. दुसऱ्या शब्दांत सरंजामी कॉर्पोरेट व्यवस्था आणि भाजप व शिवसेना असा समझोता घडून आला.

### ५. शहरी करणाचा प्रभाव

१९९० पूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणाचे सत्ता केंद्र ग्रामीण भागात होते. परंतु १९९० नंतर राजकारणा चित्र बदलत गेले. यामुळे गेल्या दोन दशकापासून ग्रामीण राजकारणापेक्षा शहरी राजकारणाला गतिशिलता आलेली दिसून येते. यांचे मुख्य कारण म्हणजे ४५.२३ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत आहे. एकूण २८८ मतदार संघापैकी १३५ ग्रामीण तर १५३ मतदारसंघ शहरी आणि निमशहरी भागात आहेत. २००९ पर्यंत शहरी आणि निमशहरी भागात पक्षीय स्पर्धा चौपदरी होती. परंतु २०१४ च्या निवडणुकीत शहरी भागात भाजपाचा वर्चस्व वाढले. शहरी भागातील एकूण १०० जागापैकी भाजपने ५३ जागा जिंकल्या. तर ३४.५ टक्के मते भाजपाला मिळाली. निमशहरी भागात एकूण ५३ जागापैकी भाजपाने २८ जागा जिंकल्या आहेत. निमशहरी भागात भाजपाला ३०.१ टक्के मते मिळाली आहेत. ग्रामीण भागाचा विचार करता भाजपाने १३५ जागा लढविल्या होत्या त्यापैकी ४२ जागा जिंकल्या. आहेत. मिळालेल्या मताचे प्रमाण पाहता ३१.११ टक्के एवढे आहे. याचाच अर्थ शहरी भागात भाजपाने ५३ टक्के जागा जिंकल्या आहेत तर हेच प्रमाण ग्रामीण भागामध्ये ३१ टक्के जागा मिळाल्या आहेत. यावरून भाजपाचा ग्रामीण भागापेक्षा शहरी भागावर वर्चस्व प्रस्थापित झालेले दिसून येते.

### ६. सामाजिक आधार

महाराष्ट्रामध्ये जातीय आधारावर फार मोठ्या प्रमाणात मतदान होते. मराठा समाज जातीने सर्वात मोठा पक्ष असला तरी त्यांच्या मताची विभागणी वेगवेगळ्या पक्षात होत असलेली दिसून येते. म्हणजेच निवडणुकीत सामाजिक आधारांची महत्त्वाची भूमिका असते. ते पुढीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

### संदर्भग्रंथ

१. लोकसत्ता दैनिक वर्तमानपत्र, २६ मे २०१४
२. मीनाक्षी सिंह, भारतीय राजनीति में भ्रष्टाचार, ओमेगा पब्लिकेशन, नई दिल्ली.
३. Ram Ahuja, Social Problems in India २०१८ ४५५-५८
४. परिवर्तनाचा वाटसरू, संपादक मंडळ, अभय कांता, तुकाराम जाधव, विजय कुंजीर, प्रकाशक, नर्मदा आफसेट, पुणे,
५. तुकाराम जाधव-संपादक, महाराष्ट्र वार्षिकी २०१५, प्रकाशन, युनिक अॅकॅडमी पुणे
६. प्रकाश पवार, काँग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपचा उदय, डायमंड प्रकाशन, पुणे
७. महाराष्ट्र निवडणूक आयोगाचे संकेत स्थळ
८. www.wikipedia.org